# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर-१८१७/२०२२

**अपिलार्थी, श्रीम.निलिमा म. पागधरे,**
**एम.एच.बी कॉलनी, कॉजवे रोड,**
**बि.नं.२/६०, माहिम (प),**
**मुंबई ४०० ०१६.**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय अक्करपट्टी, मु.पो.अक्करपट्टी,
बोईसर (प), ता.जि.पालघर ४०१ ५०१.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती कार्यालय पालघर, तहसिल
कार्यालयाच्या बाजुला, पालघर,
ता.जि.पालघर ४०१ ४०४

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २६.२.२०२६**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| **११.२.२०२२** | --- | **१०.३.२०२२** | ----- |

अपिलार्थी यांनी दि.१३.६.२०२२ रोजीच्या अर्जान्वये " माहिती प्राप्त झाली नाही." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २६.२.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थीचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. तथापि, जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*"(महादेव दत्तात्रेय पागधरे घर क्र.३५, रा.उच्छेळी, ता.जि.पालघर यांच्या नावे आपल्या कार्यालयात उपलब्ध असलेला संपूर्ण दस्तावेजाची माहिती (नमुना नं.८ नोंद घरपट्टीच्या पावत्या, ग्रामपंचायतीच्या नोंद वहीवरील नोंद इ.) देण्यात यावी माहितीची सत्यप्रत असल्यास देण्यात यावी.) "*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "माहिती प्राप्त झालेली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

या प्रकरणी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी असे निवेदन केले की, त्यांना अद्यापपर्यंत कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलिय अधिकारी हे त्यांना सुनावणीची नोटीस प्राप्त होऊनदेखील ते अनुपस्थित असल्याने या संदर्भात त्यांचे म्हणणे जाणून घेता आले नाही. सबब, अपिलार्थी यांना माहिती मिळण्यास झालेल्या विलंबाबद्दल विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी पुढील सुनावणीस आयागोकडे स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. त्याचप्रमाणे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती पुढील १५ दिवसांत शीघ्र टपालाने विनामूल्य पुरविणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१. **विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय अक्करपट्टी यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती पुढील १५ दिवसात शीघ्र टपालाने विनामूल्य पुरवावी. जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.**

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय अक्करपट्टी यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक ११.२.२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु. २५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये, **याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे दि.१६.४.२०२६ रोजी दुपारी १.०० वाजता स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, प्रस्तुत प्रकरणी त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.**

३. **प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१६.४.२०२६ रोजी दुपारी १.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २६ फेब्रुवारी, २०२६

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय अक्करपट्टी, मु.पो.अक्करपट्टी,
बोईसर (प), ता.जि.पालघर ४०१ ५०१.
**-यांना प्रत** विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय अक्करपट्टी, मु.पो.अक्करपट्टी,
बोईसर (प), ता.जि.पालघर ४०१ ५०१ **यांचेमार्फत रवाना.**

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ

**अपिल क्रमांक : के.आर-१८१७/२०२२**
**अपिलार्थी, श्रीम.निलिमा म. पागधरे,**
**सुनावणी दिनांक १६.४.२०२६** ( In Continuation of order dt.२६.२.२०२६)

## विवेचन

सदर सुनावणीस अपिलार्थीचे प्रतिनिधी तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम. जागृती किरण घरत, ग्रामपंचायत अधिकारी आणि विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. अरविंद तुकाराम संखे, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय अक्करपट्टी तसेच तत्कालीन प्रथम अपिलिय अधिकारी श्री. बी. व्ही. नाळे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती पालघर हे उपस्थित आहेत.

या प्रकरणी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी असे निवेदन केले की, हा अभिलेख जुना असून त्याचा शोध घेण्यासाठी त्यांना वेळ देण्यात यावी. सबब, त्यांची वेळेची विनंती मान्य करण्यात येत आहे. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१९.५.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.**

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १६ एप्रिल, २०२६

संगणक -10